*Corrigendum( Rfx No:* ***7000014198)***

Estimated rates in the schedule include supplementary allowance (20% of Basic as per Min. Wages) also as prescribed vide MSETCL CO HR circular No.6906 dtd. 19 sept.2019. It is mandatory for successful bidder to pay this allowance in salary to person deployed to MSETCL on outsourcing services. All prospecting bidders shall consider this allowance also while submitting their bid. All other condition in the tender shall remain same. The aforesaid circular is attached herewith.

Superintending Engineer (C)
EHV CCCM Circle, MSETCL, Aurangabad

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**
कामगार, औद्योगिक संबंध व कर्मचारी कल्याण विभाग
प्रकाशगंगा प्लॉट नं.सी-१९, ई-ब्लॉक, ४ था मजला, बांद्रा-कुर्ला-कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१

क्र.महापारेषण/मासं/का.औ.सं.क.क.वि/ 06906 दिनांक: **१९ सप्टेंबर २०१९**

**परिपत्रक**

**विषय :** कंत्राटदारांमार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांना सध्याचा मूळ वेतनाच्या २०% रक्कम पूरक भत्ता म्हणून अदा करणेबाबत.

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.१४२, दि.०३.०१.२०१४.
२. परिपत्रक क्र. महापारेषण/मासं/का.औ.सं.क.क.वि/६३३३, दिनांक २६ ऑगस्ट २०१९

शासनाचे उप सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय यांनी दिनाक २४ जुलै - २०१९ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक - ल मध्ये प्रसिध्द केलेल्या शुध्दीपत्रकानुसार मुंबई दुकाने व आस्थापना उद्योगातील अनुसूचिकरिता किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांचे किमान वेतन दर दि.२४.०७.२०१९ पासून पुर्ननिर्धारित केलेले आहेत त्यानुसार संदर्भिय परिपत्रक क्र.२ अन्वये महापारेषण कंपनीमध्ये कंत्राटदारामार्फत कंत्राटीपध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना सुधारीत दराने मूळ किमान वेतन दि.२४.०७.२०१९ पासून लागू करण्यात आलेले आहेत.

महापारेषण कंपनीमध्ये कंत्राटारांमार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांना मासिक वेतनात वाढ देण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार, मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांनी संचालक (वित्त), संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) यांच्याशी विचारविनिमय करुन महापारेषण कंपनीतील कंत्राटदारामार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांना सध्याच्या मूळ वेतनाच्या २०% रक्कम पूरक भत्ता म्हणून मासिक वेतनासोबत अदा करण्याबाबत मंजूरी प्रदान केलेली आहे.

**मूळ वेतनाच्या २०% रक्कम पूरक भत्ता म्हणून अदा करावयाच्या दराचा तक्ता खालीलप्रमाण राहील.**

| कामगारांची वर्गवारी | दि.०१/१०/२०१९ पासून मूळ वेतनाच्या २०% रक्कमेच्या पूरक भत्त्याचा दर खालीलप्रमाणे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | परिमंडळ - १ | | परिमंडळ - २ | | परिमंडळ - ३ | |
| | मूळ वेतन | २०% पूरक भत्त्याची रक्कम | मूळ वेतन | २०% पूरक भत्त्याची रक्कम | मूळ वेतन | २०% पूरक भत्त्याची रक्कम |
| कुशल | ११,६३२/- | २,३२६/- | ११,०३६/- | २,२०७/- | १०,४४०/- | २,०८८/- |
| अर्ध कुशल | १०,८५६/- | २,१७१/- | १०,२६०/- | २,०५२/- | ९,६६४/- | १,९३३/- |
| अकुशल | १०,०२१/- | २,००४/- | ९,४२५/- | १,८८५/- | ८,८२८/- | १,७६६/- |
| उपरोक्त वेतना व्यतिरिक्त संदर्भिय परिपत्रकात नमूद केलेले इतर पात्र भत्ते देय राहतील. | | | | | | |

सबब, सर्व परिमंडळ कार्यालयांना याद्वारे निर्देशित करण्यात येते की, आपल्या अखत्यारित कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना दि.०१.१०.२०१९ पासून वरीलप्रमाणे मूळ वेतनाच्या २०% रक्कम पूरक भत्ता म्हणून मासिक वेतनासोबत देण्यात यावा. सदरच्या पूरक भत्त्याची रक्कम ही ठेकेदाराच्या नफ्याच्या टक्केवारीसाठी गृहीत धरण्यात येऊ नये.

१८/०९/२०१९

(सुगत गमरे)
कार्यकारी संचालक (मासं)

प्रत :
प्रेषण यादीप्रमाणे परिमंडळ कार्यालयातील कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.